# अंबरनाथमधील स्वच्छ वॉर्ड विजेत्यांचा गौरव

स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाराष्ट्र शासनातर्फे नगरपालिकांसाठी स्वच्छ वॉर्ड स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने अंबरनाथ नगरपरिषदेच्या हद्दीमधील एकूण 57 प्रभागांमध्येही सदर स्पर्धा पार पडली. प्रभाग स्वच्छता स्पर्धा 2018 या स्पर्धेत विविध निकष ठरविण्यात आले होते. या स्पर्धेत अंबरनाथ नगरपरिषदेच्या प्रभाग क्र. 44 ( नगरसेवक सुभाष साळुंके ) प्रभाग क्र. 48 ( नगरसेविका अपर्णा भोईर ) आणि प्रभाग क्र. 46 ( नगरसेविका विणा उगले ) यांनी अनुक्रमे प्रथम, व्दितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या प्रभागांच्या नगरसेवकांचा महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून नगराध्यक्षा मनीषा वाळेकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी बक्षीसांचेही वाटप करण्यात आले. त्यामध्ये प्रथम क्रमांक विजेत्या प्रभागास 30 लाखांचे बक्षीस आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. तर व्दितीय क्रमांक विजेत्या प्रभागास 20 लाख रुपये आणि तृतीय क्रमांक विजेत्या प्रभागास 15 लाख आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. सदर बक्षिसाचा स्विकार संबंधित विभागाचे विद्यमान नगरसेवक यांनी केला. अंबरनाथ पूर्व भागातील सूर्योदय सभागृह येथे हा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्याधिकारी देविदास पवार, स्वच्छता दूत सलील जव्हेरी, नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

# अंबरनाथ नगरपालिकेतर्फे शिक्षकांचा गौरव

अंबरनाथ नगरपालिका आणि शिक्षण मंडळातर्फे अंबरनाथ पालिकेतील शाळांसह शहरातील विविध शाळांतील 25 वर्षे पूर्ण केलेल्या सुमारे 60 शिक्षकांचा गौरव करण्यात आला. अंबरनाथ नगरपालिका शाळेतील भारती झोपे, जयश्री काळे यांनी पीएचडी मिळवल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान झाला. कार्यक्रमास सुमारे 500 च्या वर शिक्षक उपस्थित होते. आमदार डॉ. बालाजी किणीकर, नगराध्यक्षा मनीषा वाळेकर, शिक्षण समिती सभापती आणि उपनगराध्यक्ष अब्दुल शेख, ठाणे जिल्हा मुख्याधिकारी देविदास पवार, नगरसेवक प्रदीप पाटील आदींच्या हस्ते शिक्षकांचा गौरव झाला. विजय बाविस्कर यांनी सूत्रसंचालन केले; तर शेषमल राठोड यांनी आभार मानले.